महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग,

**अधीक्षक अभियंता, (विशेष प्रकल्प) मंडळ, औरंगाबाद**

# नागरिकांची सनद

**सुची.**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **पृष्ठ क्रमांक.** |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना. | १ |
| २ | अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ औरंगाबाद कार्यालयाची बांधिलकी व नागरीकांची जबाबदारी. | २ ते ३ |
| ३ | विशेष प्रकल्प मंडळ औरंगाबाद ची रचना | ४ |
| ४ | विभागीय कार्यालयाचे नावे व कार्यक्षेत्र. | ४ |
| ५ | मंडळातर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक माहितीची सुलभता | ५ |
| ६ | मंडळाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता. | ५ |
| ७ | गा-हाण्याचे निराकरण,सनदेचा आढावा व जनसामान्याच्या सुचना. | ६ |
| ८ | सनदेची अमलबजावणी व प्रतिसाद. | ६ |
| ९ | परिशिष्टे. | ७ ते ९ |

# १) प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या १५० वर्षाहुन जास्त गौरवशाली परंपरा असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागातंर्गत अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां) मंडळ, औरंगाबाद हा गेल्या दिनांक.२०/७/२००५ वर्षापासून कार्यरत आहे. हे मंडळ दि.२०/७/०५ ला स्थापन झाल्यापासून मुख्य अभियंता,सा.बां.प्रादेशिक विभाग, औरंगाबाद याच्या कार्यकक्षेत अधिनस्त होते.तथापी शासन आदेश क्र.ईएसटी-१००९/प्रक्र-२७८/प्रशासन-१ दिनांक.१४/१२/२००९ पासून हे मंडळ मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, (सा.बां) महाराष्ट्र शासन, ५ वा मजला,कोकणभवन, नवी मुंबई. यांच्या कार्यालयास वर्ग करण्यात आले असून प्रत्यक्षात दिनांक.३१/३/२०१० पासून हे मंडळ मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, (सा.बां) महाराष्ट्र शासन, ५ वा मजला,कोकणभवन, नवी मुंबई. अधिनस्त वर्ग झाले आहे.

या मंडळा अंतर्गत पुणे-सोलापुर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.९ तसेच सोलापुर उस्मानाबाद बीड औरंगाबाद धुळे रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ व कल्याण नगर बीड परभणी नांदेड रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ असे एकुण-३ राष्ट्रीय महामार्ग रस्ते दुरुस्ती व देखभालीसाठी कार्यरत आहे. या रस्त्याची राष्ट्रीय महामार्गाची विभागणी १) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद २) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, बीड ३) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, उस्मानाबाद ४) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नांदेड या चार विभागात केलेली आहे.हे चार विभाग अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद (कार्यालय बांधकाम भवन इमारत जुन्हा हायकोर्टच्या मागे अदालत रोड औरंगाबाद) यांचे अधिपत्याखाली कार्यरत आहे.मराठवाडयातील नागरीकांशी बांधिलकी जपण्यास ही कार्यालये कटीबध्द आहे. ही बांधिलकी विशेष प्रकल्प (सा.बां.) मंडळ औरंगाबाद या सनदेद्वारे जाहीर करत आहे. हे मंडळ कार्यालय नांगरीकांना पुढील सुविधा पुरविण्यास बांधील आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारीत केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपुर्वक व सन्मानपुर्वक वागणुकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरीकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतीपुर्वक सोडवावेत हा दृष्टीकोण विचारात घेऊन तसेच सर्वसामान्य नागरीकांसाठी ही सनद तयार करण्यात आली आहे.

२) **<u>विशेष प्रकल्प (सा.बां) मंडळ औरंगाबाद या कार्यालयाची बांधिलकी व नागरीकांची जबाबदारी.</u>**

**<u>विशेष प्रकल्प (सा.बां) मंडळ कार्यालयाची बांधीलकी.</u>**

१) मराठवाडयातील राष्ट्रीय महामार्ग सोलापुर औरंगाबाद,-धुळे रस्ता राष्ट्रीय महामार्ग २११,कल्याण नगर-बीड नांदेड रस्ता राष्ट्रीय महामार्ग-२२२ व पुणे सोलापुर हैद्राबाद रस्ता राष्ट्रीय महामार्ग-९ ही आहेत या मार्गाची देखभाल व दुरुस्ती,मानकाप्रमाणे करुन रस्त्याचा दर्जा उत्तम राखणे.

२) नांदेड येथील शासकीय सामाजिक न्याय खात्याच्या इमारतीचे बांधकामे खात्याने ठरवलेल्या मानकानुसार उत्तम दर्जाची व गुणवत्तापुर्वक रित्या करणे.

३) या विभागाच्या कार्यालयांशी संलग्न असलेल्या इतर सर्व शासकीय विभागांना तांत्रिक सल्ला देणे व शासकीय कामकाजात सुसुत्रता ठेवणे.

४) या मंडळाच्या अखत्यारितील सर्व कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

५) आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने अभियांत्रिकीशी संबंधीत आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

६) या मंडळाच्या कार्यालयात व मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व कार्यालयातुन कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.

७) या मंडळाच्या कार्यालयात व मंडळ कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

८) माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत या मंडळाच्या कार्यकक्षेतील मागीतलेली माहिती संबंधीतांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे बाबत संबंधीत मंडळ, विभागीय स्तरावर त्वरीत कार्यवाही करणे.

९) कार्यालयाच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधूनिकता आणून या विभागाच्या कार्यालयांची व सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

१०) संगणकीकरणाबाबत या विभागाच्या सर्व मंडळाअंतर्गत विभागीय कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्कने जोडणे प्रादेशिक कार्यालय व मंत्रालय यांना नेटवर्कद्वारे आवश्यक व तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

११) या विभागातंर्गत आवश्यक व अद्यावत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्यावत करणे.

१२) सर्व विषयाची अनुसूचि तयार करणे व निपटारा करणेचा विहित कालावधी ठरविणे.

१३) कार्यालयामध्ये सर्व अभिलेखे अद्यावंत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत करणे.

१४) राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर वेगवेगळया सेवावाहिन्या टाकण्याची व त्यांच्या दुरुस्तीसाठी परवानगी देणे.तसेच महामार्गालगत निवासी व व्यावसायिक स्वरुपाच्या बांधकामांना आवश्यक ते ना-हरकत प्रमाणपत्र देणे.

१५) नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना विशेष प्रकल्प मंडळ औरंगाबाद खालील कर्तव्य पारपाडतील.

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधीलकी ठेवील.

ब) सौजन्यपुर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे/प्रमाणपत्रे/ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती,पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

**<u>नागरीकांची जबाबदारी.</u>**

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेशी नागरीकांची वर्तणुक सौजन्यपुर्वक असावी.

नागरीकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपुर्ण रित्या मिळावी.

नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

विहित केलेल्या कालवधीपेक्षा कमी कलावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

सार्वजनिक मालमतेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.

नागरीकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दुर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.

रस्त्याच्या दोन्ही बाजुना असणा-या वृक्षाचे जतन करणे ही नागरीकांची सुध्दा जबाबदारी राहील.

नागरीकांनी कायदेशिर तरतुदी,नियम,अलिखीत संकेत यांच पालन करावे.

नागरीकांनी सार्वजनिक हित,एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

**<u>३) विशेष प्रकल्प (सा.बां) मंडळ औरंगाबाद कार्यालयाची रचना.</u>**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंडळ स्तरावरील अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ ,औरंगाबाद कार्यालय शासनाने दिनांक. २०/७/२००५ रोजी स्थापन झाले आहे. अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांच्या अधिपत्याखाली कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग औरंगाबाद/नांदेड/उस्मानाबाद/बीड येतात. या कार्यालया मार्फत मराठवाडयातील राष्ट्रीय महामार्गाची देखभाल व दुरुस्ती करण्यात येते. अधीक्षक अभियंता, याचे अधिपत्याखाली-४ कार्यकारी अभियंता असून त्या चार कार्यकारी अभियंता यांच्या अधिपत्याखाली एकुण- १८ उप अभियंता कार्यरत आहेत

अधीक्षक अभियंता, यांच्या कार्यक्षेत्राचा नकाशा, कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांची मुख्यालये दर्शविणारा वृक्ष तक्ता (tree chart) परिशिष्ट अ म्हणुन सोबत जोडला आहे.

कार्यकारी अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग हा ख-या अर्थाने माहितीचा स्त्रोत असतो.कुठल्याही रस्ते,बांधकामची सविस्तर माहिती अगदी सुरवातीपासून संबधीत कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात मिळु शकते.

प्रस्तावनेत नमुद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम पुरवित असतो हया विभागातंर्गत कामांच्या अमलबजावणीसाठी सा.बां.नियमावली,लेखा सहिता,विनिर्देश वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिका-याकडून केले जाते.

. **अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांच्या अधिपत्याखाली चार विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र पुढील प्रमाणे आहे.**

**राष्ट्रीय महामार्गाचे क्रमांक व लांबी कि.मी. मध्ये)**

रा.म.क्र.- ९ पुणे-सोलापूर-हैद्राबाद :- (२६९/८०० ते ३४८/७२० ) एकुण लांबी - ७८.९२

रा.म.क्र.- २११ सोलापूर-उस्मानाबाद-धुळेः- (१६/४०० ते ३७९/७६०) एकुण लांबी- ३६३.३६०

रा.म.क्र.- २२२ कल्याण-नगर-बीड-नांदेडः- (३०३/१०० ते ६१५/००) एकुण लांबी - ३११.९००

**या मंडळाअंतर्गत विभाग व उप विभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्र व त्यांच्या अधिपत्याखाली येणारे राष्ट्रीय महामार्ग खालील प्रमाणे आहेत .**

७५४.१८०

## *विभागवार माहितीः-*

**१) विभाग :- कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, उस्मानाबाद.**
**यांचे कार्यकक्षेतील उपविभाग.**

१) राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग, उमरगा. रा.म.क्र.९ (२६९/८०० ते ३४८/७२०) लांबी ७८.९२

२) राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग, तुळजापर. रा.म.क्र.-२११ (१६/४०० ते ७८/००) लांबी ६१.६०

३) राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग, उस्मानाबाद. रा.म.क्र.-२११ (७८/०० ते १४०/४००) लांबी ६२.४०

एकुण विभागाची लांबी :- २०२.९२

**२) विभाग :- कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, बीड**
**यांचे कार्यकक्षेतील उपविभाग.**

१) राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग, बीड. रा.म.क्र.२११ (१४०/४०० ते १८०/००) लांबी ३९.६००

२) राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग, गेवराई. रा.म.क्र.-२११ (१८०/०० ते २२१/००) लांबी - ४१.००

रा.म.क्र.-२२२ (३०३/१०० ते ३३६/०५०) लांबी - ३२.९५

(४१.०० +३२.९५) = एकुण लांबी ७३.९५

३) राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग, माजलगांव. रा.म.क्र.-२२२

(३३६/०५० ते ४१५/८५५) लांबी ७९.८०५

एकुण विभागाची लांबी- १९३.३५५

**३) विभाग :- कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग,औरंगाबाद**
**यांचे कार्यकक्षेतील उपविभाग.**

१) राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग, क्र.५ औरंगाबाद. रा.म.क्र.२११ (२२१/०० ते ३००/००)लांबी ७९.००

२) राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग, औरंगाबाद. रा.म.क्र.-२११

(३००/०० ते ३७९/७६०) लांबी ७९.७६

---------------

एकुण विभागाची लांबी- १५८.७६

३) विशेष प्रकल्प विभाग वैजापुर अ.अ.सा.बां.मंडळ औरंगाबाद यांच्या अधिनस्त आहे..

४) विशेष प्रकल्प विभाग गंगापुर सद्या हा उप विभाग अ.अ.सा.बां.मंडळ औरंगाबाद यांच्या अधिनस्त झाला असून त्याचे नामाभिधान वि.प्र.उप विभाग क्र.२ सिल्लोड असे करण्यात आले असून तो सिल्लो जि.औरंगाबद येथे स्थलांतरीत झाला आहे.

**४) विभाग :- कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नांदेड**
**यांचे कार्यकक्षेतील उपविभाग.**

१) राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग, मानवत, रा.म.क्र.२२२ (४१५/८५५ ते ४८७/००)लांबी ७१.१४५

२) राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग, नांदेड. रा.म.क्र.-२२२ (४८७/०० ते ५५४/००) लांबी ६७.००

३) राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग, भोकर. रा.म.क्र.-२२२ (५५४/०० ते ६१५/००) लांबी ६१.००

एकुण विभागाची लांबी-१९९.१४५

**५) <u>विभागांतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक माहितीची सुलभता व खाजगीकरण करणे.</u>**

**अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक.**

राष्ट्रीय महामार्ग सा.बां.विभाग औरंगाबाद/बीड/नांदेड/उस्मानाबाद या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील विविध ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी त्यास सक्षम अधिकारी इत्यादीची माहिती तसेच सर्व पुल व इमारती आणि इतर कामा विषयीची माहिती कार्यवृतांत वेळापत्रकात (परिशिष्ट क) नमुद केली आहे.अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे याची माहिती विहित पत्रे भरुन संबंधीत विभागीय कार्यालयात मिळु शकेल.

नैसर्गीक आपत्ती कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उदभवल्यास या वेळापत्राकातील कार्यपुर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल.

**ब) माहितीची सुलभता.**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या maha pwd.com या वेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन) वेळोवेळी सादर केल्या जाणा-या विभागांतर्गत माहितीचा तपशील व आकडेवारीचा तपशील जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

**६) <u>विशेष प्रकल्प सा. बां. मंडळ औरंगाबाद कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता.</u>**

सार्वजनिक बांधकाम विभागाने शासन स्तरावर रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी ‘अपघात निवारण समितीस्थापन केली आहे.ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते. अपघात निवारण समितीने विशेष प्रकल्प (सा.बां) मंडळ,औरंगाबाद कार्यक्षेत्रातील रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करुन सुचविलेल्या अपघात प्रवण स्थळांची सुधारणा व उपाययोजना टप्प्या-टप्प्याने हाती घेतली आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्गाच्या एकुण लांबीमध्ये प्रामुख्याने १८२ अपघात प्रवण स्थळे समितीने सुचविली असुन त्यापैकी १५८ अपघात प्रवण स्थळांची सुधारणा प्राधान्याने हाती घेऊन पूर्ण करण्यात आली आहेत. व उर्वरित २४ अपघात प्रवणस्थळाची सुधारणा करणे अद्याप बाकी आहे.त्यासाठी. आवश्यक त्या ठिकाणी रस्त्यावर तपशीलवार व आवश्यक असे माहिती फलक लावण्यात आले आहेत, जेणेकरुन रस्ते वाहतुकीस पादचा-यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित ठेवण्याचा मानस आहे.

**७) गा-हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा, व जनसामान्यांची छाननी.**

**अ) गा-हाणी/तक्रारी यांचे निराकरण.**

या मंडळा अंतर्गत विभागाबाबत अथवा काही कामा बाबत तक्रारी असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ - उपविभागीय कार्यालयाविरुध्द गा-हाणे / तक्रारी असल्यास विभाग कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे, व तक्रार नोंदवावी व विभाग कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/ तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे गाऱ्हाणे मांडावे, आणि तक्रार नोंदवावी. व मंडळ कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास मुख्य अभियंता, यांचेकडे गा-हाणे मांडावी, आणि तक्रार नोंदवावी. अशा गाऱ्हाणी/तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसात करण्यात येईल. गा-हाणी / तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र तक्रार पेटी ठेवण्यात येत आहे.गा-हाणी समक्ष भेटीत /पत्राने वा ई मेलव्दारे ही नागरिक मांडू शकतात.

**ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन.**

या विभागाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा विशेष प्रकल्प (सा.बां) मंडळ औरंगाबाद अंतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

**क) जनसामान्यांकडून सुचना.**

या विभागाची ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभिर्यपुर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवुन आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहुन काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणा-या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**८) नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी.**

विशेष प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) मंळडातर्गत नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी दिनांक.२०/७/२००५ पासुन करण्यास मंडळ कटिबध्द आहे.सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया /अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचीत आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.विशेष प्रकल्प (सा.बां) मंडळ, औरंगाबाद खात्रीपुर्वक गुणवतेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. तसेच कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील सौजन्यपुर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणुक मिळेल. ग्राहक केंद्रित सेवेची उद्दिष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशिर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल.प्रशिक्षित व प्रोत्साहित कर्मचारी वर्गाव्दारे ग्राहकांना सेवा पुरविली जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल व तक्रारशुन्य सेवा असल्याची खात्री करण्यात येईल.

**परिशिष्ट-अ**

**मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, (सा.बां) महाराष्ट्र शासन ,५ वा मजला, कोकणभवन नवी मुंबई यांचे अधिनस्त.**

**अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद.**

**अतंर्गत वृक्ष तक्ता औरंगाबाद.**

| | | | |
|---|---|---|---|
| **कार्यकारी अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग विभाग औरंगाबाद. | **कार्यकारी अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग विभाग उस्मानाबाद. | **कार्यकारी अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग विभाग नांदेड | **कार्यकारी अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग विभाग बीड |
| **उप अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग उप विभाग क्र.५ औरंगाबाद. | **उप अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग उप विभाग उस्मानाबाद. | **उप अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग उप विभाग नांदेड | **उप अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग उप विभाग बीड |
| **उप अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग उप विभाग कन्नड | **उप अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग उप विभाग तुळजापुर | **उप अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग उप विभाग भोकर | **उप अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग उप विभाग माजलगांव |
| **उप अभियंता**<br>विशेष प्रकर्ल्प उप विभाग सिल्लोड. (अ.अ.सा.बां.मंडळ औरंगाबाद यांचे अधिनस्त) | **उप अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग उप विभाग उमरगा. | **उप अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग उप विभाग मानवत | **उप अभियंता**<br>राष्ट्रीय महामार्ग उप विभाग गेवराई. |
| **उप अभियंता**<br>विशेष प्रकर्ल्प उप विभाग वैजापुर. (अ.अ.सा.बां.मंडळ औरंगाबाद यांचे अधिनस्त) | | | |

**परिशिष्ट क.**

**कार्यपुर्तीचे वेळापत्राक.**

| अ.क्र. | कार्यसुचि | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी. | कार्यपुर्तीचा कालवधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अर्जावर अकृष्ीक अभिप्राय/ना हरकत अभिप्राय. | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| २ | पेट्रोल पंप व पेट्रोलपंपांच्या पोहोच मार्गाचे ना हरकत प्रमाणपत्र.देणे | कार्यकारी अभियंता यांचे कडून विहित मार्गाने भुतलपरिवहन मंत्रालय केंद्र शासनास सादर.करण्यात येते. (सक्षम अधिकारी केंद्र शासन) | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ३ | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यासाठी व रस्त्याच्या बाजुला टाकण्यात येणा-या वाहिन्या बाबत ना हरकत प्रमाणपत्र देणे | कार्यकारी अभियंता यांचे कडून विहित मार्गाने मुख्य अभियंता राष्ट्रीय महामार्ग सा.बां. महाराष्ट्र शासन, कोकण भवन नवी मुंबई यांना सादर करण्यात.येते. | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ४ | रस्त्याच्या बजुला जाहिरात फलक लावणे बाबत ना हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यकारी अभियंता यांचे कडून विहित मार्गाने मुख्य अभियंता राष्ट्रीय महामार्ग सा.बां. महाराष्ट्र शासन, कोकण भवन नवी मुंबई यांना सादर करण्यात.येते. | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |